**तरुण भारत** बुधवार, ४ मे २०२२

## प्रा. गाथाडे यांच्या 'गावठाण' कथासंग्रहाला पुरस्कार

दोडामार्ग : लातुर येथील अण्णाभाऊ साठे साहित्य परिषदेच्यावतीने देण्यात येणारा २०२२ सालचा राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्कार दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांच्या गावठाण कथासंग्रहाला जाहीर झाला आहे. डॉ. गाथाडे यांचा गावठाण हा पहिलाच कथासंग्रह असून या कथासंग्रहामधून त्यांनी हुंडा, बेरोजगारी, दुष्काळ, ग्रामीण शहरी संघर्ष, शेतकऱ्यांचे प्रश्न, नैतिक अनैतिक संबंध, पाणी स्मशानभूमी आणि शिक्षण व्यवस्थेमधील भीषण प्रश्न मांडले आहेत. त्यांच्या या कथालेखनाची दखल घेऊन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथालेखक आणाभाऊ साठे यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी गावठाण कथासंग्रहाची निवड करण्यात आली आहे. डॉ. गाथाडे हे गेल्या वीस वर्षांपासून वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करीत आहेत. त्यांच्या लिखाणाला यापूर्वीही अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ३ मे २०२२ रोजी लातूर येथे होत असलेल्या पाचव्या आणाभाऊ साठे साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दोन हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रसिद्ध लेखक प्रवीण बांदेकर, अजय कांडर, श्रीपाल सबनीस, प्रभाकर ढगे, प्रा. डॉ. सोमनाथ कदम, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.